**पंतप्रधानांनी भूतानचे चौथे राजे यांची औपचारिक भेट घेतली आणि जागतिक शांतता प्रार्थना महोत्सवात सहभाग नोंदवला (12 नोव्हेंबर 2025)**

12 नोव्हेंबर 2025

पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी आज थिम्फू मध्ये भूतानचे चौथे राजे महामहिम जिग्मे सिंगे वांगचूक यांची औपचारिक भेट घेतली.

2. पंतप्रधानांनी महामहिम, चौथे राजे यांना त्यांच्या 70व्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या आणि महामहिम ' यांच्या उत्तम आरोग्य आणि स्वास्थ्यासाठी भारत सरकार तसेच भारतीय जनतेकडून त्यांचे अभिष्टचिंतन करून शुभेच्छा दिल्या. भारत-भूतान मैत्री आणखी घट्ट करण्यासाठी त्यांचे नेतृत्व, सल्ला आणि मार्गदर्शन केल्याबद्दल पंतप्रधानांनी महामहिम चौथ्या राजांचे आभार मानले. उभय नेत्यांनी द्विपक्षीय संबंध आणि परस्पर हिताच्या मुद्द्यांवर चर्चा केली. या संदर्भात, दोन्ही देशांच्या नागरिकांना जवळ आणणाऱ्या सामायिक आध्यात्मिक आणि सांस्कृतिक बंधांना त्यांनी अधोरेखित केले.

3. थिम्फू येथे सुरू असलेल्या जागतिक शांतता प्रार्थना महोत्सवाचा एक भाग म्हणून चांगलिमिथांग स्टेडियम येथील कालचक्र दीक्षा समारंभात पंतप्रधान महामहिम, भूतानचे राजे, महामहिम, भूतानचे चौथे राजे आणि भूतानचे पंतप्रधान यांच्यासह सामील झाले. भूतानचे मुख्य मठाधिपती परमपूज्य जे खेंपो यांच्या अध्यक्षतेखाली प्रार्थना करण्यात आली.

थिम्फू

12 नोव्हेंबर 2025